MHBI020030332021

**<u>वारस अर्ज क्र. १८२६/२०२१ मधील निशाणी क्र. १ खालील आदेश</u>**

अर्जदारांनी प्रस्तुतचा अर्ज बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ नुसार वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. अभिलेखावरील पुराव्याचे अवलोकन केले. अर्जदारांच्या विद्वान वकिलांचा पुकारा केला असता गैरहजर. अर्जदार क्र. २ उदयराज शैलेश साबळे (अ.सा.१) याने त्याचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र (निशाणी क्र.११) दाखल केलेले आहे. त्यात त्याचे असे कथन आहे की, मयत महेंद्र राजाराम साबळे हा दिनांक २१.०४.२०११ रोजी मयत झालेला आहे. अर्जदार क्र. १ ही मयताची आई असून अर्जदार क्र. २ हा मयताचा पुतण्या आहे. मयत महेंद्र राजाराम साबळे हा मृत्युसमयी अविवाहीत होता. मयत महेंद्र राजाराम साबळे याला अर्जदारांशिवाय अन्य कोणीही वारस नाहीत. अर्जदारांना शासकीय व कार्यालयीन उपयोगाकरिता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी विनंती केली आहे.

३. सदर अर्जाचे जाहीर प्रगटन (निशाणी क्र. १०) वर्तमानपत्रात प्रसिध्द झाल्यानंतर आणि जाहीरनामा (निशाणी क्र. ७) बजावणी झाल्यानंतर सदर वारस दाखला देण्यास कोणीही आजपर्यंत हरकत घेतलेली नाही.

४. अर्जदारांनी मयत महेंद्र राजाराम साबळे याचे मृत्यु प्रमाणपत्र (निशाणी क्र. ६) दाखल केलेले आहे. त्याचे अवलोकन केले असता मयत महेंद्र राजाराम साबळे याचा मृत्यु दिनांक २१.०४.२०११ रोजी झाल्याचे दिसून येते. अर्जदारांच्या अर्जाला कोणीही आव्हानीत केलेले नाही. उपरोक्त पुराव्यावरून असे दिसून येते की,

अर्जदार क्र. १ ही मयताची आई असून ती वर्ग–१ ची वारस आहे व अर्जदार क्र. २ हा वर्ग–४ चा वारस आहे. अर्जदार क्र. १ ही मयत महेंद्र राजाराम साबळे याची वर्ग–१ ची वारस असल्यामुळे तिला वारस प्रमाणपत्र मिळण्याचा अधिकार आहे. म्हणून मी पुढीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे –

**आ दे श**

१. अर्ज अंशत: मंजुर करण्यात येत आहे.

२. अर्जदार क्र. १. सुक्मनबाई राजाराम साबळे ही मयत महेंद्र राजाराम साबळे याची वारस आहे असे वारस प्रमाणपत्र महाराष्ट्र न्यायालयीन शुल्क अधिनियमाच्या तरतुदी नुसार विहीत न्यायालयीन शुल्क अर्जदारांनी भरल्यास देण्यात यावे.

SUNITA DHANRAJ SONI

Digitally signed by SUNITA DHANRAJ SONI
Date: 2026.08.14 17:41:41 +0530

(श्रीमती एस. डी. सोनी)

दिनांक – १४/०८/२०२६

२ रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
बीड.

<u>CERTIFICATE</u>

"I affirm that the contents of this PDF file are word to word as per original order."

Sd/-
(T. H. Shaikh )
Stenographer Grade III

| | | |
|---|---|---|
| Dictated on | : | 14/08/2026. |
| Transcribed on | : | 14/08/2026. |
| Checked and signed on | : | 14/08/2026. |